# राष्ट्रीय आरोग्य अभियान,जिल्हा परिषद बुलडाणा

## कंत्राटी पदभरती जाहिरात

## उमेदवारांकरीता सुचना

### कंत्राटी पदभरती जाहिरात
### उमेदवारांकरीता सुचना

जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटंब कल्याण सोसायटी जिल्हा परीषद बुलडाणा अंतर्गत १५ व्या वित्त आयोगा मध्ये मंजुर Medical Officer MBBS, Staff Nurse, MPW (Male) ही रिक्त कंत्राटी पदे भरावयाची आहेत, त्यानुसार सदर पदांकरीता इच्छुक उमेदवारांकरीता जिल्हा परीषद बुलडाणाच्या अधिकृत संकेत स्थळावर (www.zp.Buldhana.in) तसेच मा.जिल्हाधिकारी कार्यालयाचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिदध करण्यात येत आहे, त्यानुसार MBBS पदासाठी दिनांक २०/०४/२०२३ ते २४/०४/२०२३ कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते ०६.०० या कालावधीत विहीत नमुन्यामध्ये आवश्यक डिमांड ड्राप्ट सह अर्ज जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद बुलडाणा येथे (सुटीचे दिवस वगळुन) सादर करावे MBBS पदासाठी दिनांक २४/०४/२०२३ नंतर प्राप्त अर्जांचा विचार केल्या जाणार नाही. MBBS पदाच्या पात्र उमेदवारांची यादी दिनांक २५/४/२०२३ रोजी उपरोक्त संकेतस्थळावर प्रसिदध करण्यात येवुन पात्र उमेदवारांची मुलाखत दिनांक.२६/०४/२०२३ रोजी घेण्यात येईल

Staff Nurse व MPW (Male) या पदासाठी दिनांक २०/०४/२०२३ ते २८/०४/२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते ०६.०० या कालावधीत विहीत नमुन्यामध्ये आवश्यक डिमांड ड्राप्ट सह अर्ज जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद बुलडाणा येथे (सुटीचे दिवस वगळुन) सादर करावे. Staff Nurse व MPW (Male) या पदासाठी दिनांक २८/०४/२०२३ रोजी सायंकाळी ०६.०० नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

अध्यक्ष निवड समिती

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, बुलडाणा

## १५ व्या वित्त आयोग अंतर्गत कंत्राटी मनुष्यबळ पदभरती प्रक्रिया सन -२०२३

### जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी,

### जिल्हा परिषद बुलडाणा

आरोग्य विभाग जिल्हा परिषद, बुलडाणा क्षेत्राकरिता कंत्राटी मनुष्यबळ पदभरती कंत्राटी पद्धतीने एकत्रित मानधन तत्त्वावर खालील तकत्यात दर्शविलेल्या पदांसाठी पात्र उमेदवारांकडुन विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

त्यानुसार Medical Office (MBBS) या पदासाठी थेट मुलाखती घेण्यात येणार असुन MPW (Male) व Staff Nurse (Female) या पदांसाठी रा.आ.अ.च्या मार्गदर्शक सुचना अटी व शर्ती नुसार **भरतीप्रकिया राबविण्यात येणार आहे**

| | पदाचे नाव | एकुण पदे | वय | शैक्षणिक अर्हता | पदस्थापनेची ठिकाण | एकत्रित मानधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | Medical Office (MBBS) | एकुण ३२ SC4, ST2, VJ1, NTB 1, NTC 1, NTD 1, SBC 1, OBC 6, EWS 3, OPEN 12 | खुला प्रवर्ग ३८, राखीव प्रवर्ग ४३, NHM कर्मचारी ०५ वर्ष शिथील, निवृत्त शासकिय अधिकारी ७० वर्ष | MBBS | अर्बन HWC | रु. ६०,००० /- प्रतिमहिना | मुलाखत दिनांक २६/०४/२०२३ |
| २. | MPW (Male) | एकुण ३२ SC4, ST2, VJ1, NTB 1, NTC 1, NTD 1, SBC 1, OBC 6, EWS 3, OPEN 12 | खुला ३८, राखीव ४३, NHM कर्मचारी ५ वर्ष शिथील | 12 th Pass in Science + Parmedical Basic Traning Course or Sanitary Inspector Course | अर्बन HWC | रु. १८,००० /- प्रतिमहिना | NHM च्या मार्गदर्शक सुचनांनुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येईल |
| ३. | Staff Nurse (Female) | एकुण ३२ SC4, ST2, VJ1, NTB 1, NTC 1, NTD 1, SBC 1, OBC 6, EWS 3, OPEN 12 | खुला ३८, राखीव ४३, NHM कर्मचारी ५ व र्ष शिथील | GNM/BSc Nursing | अर्बन HWC | रु. २०,००० /- प्रतिमहिना | NHM च्या मार्गदर्शक सुचनांनुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येईल |

**अटी व शर्ती**

१) उपरोक्त पदे ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती ११ महिने कालावधीची राहील.

२) शासनाने सदर पदे नामंजुर केल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता उमेदवाराची सेवा संपुष्टात आणली जाईल.

३) जाहिरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील आहेत सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही,तसेच अर्जदाराला शासकीय नियीमत सेवेत समावुन घेणे किवा शासनामार्फत सेवा संरक्षण किवा त्यासंबधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही

४) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

५) उपरोक्त कंत्राटी पदाकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

६) सेवानिवृत्त विशेषतज्ञ/कर्मचारी यांची निवड झाल्यास सदर पदाकरीता मानधन राज्य स्तरावरुन प्राप्त विहीत मार्गदर्शक सुचनानुसार मोजमाप करुण अदा करण्यात येईल यांची नोद घ्यावी.

७) जाहिरातीमधील रिक्त पदाच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणमध्ये बदल होऊ शकतो याबाबत चे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.बुलढाणा यांनी राखुन ठेवले आहेत.

८) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल

९) एकापेक्षा अधिक संवर्गा मध्ये अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारानी प्रत्येक संवर्गाकरीता स्वंतत्र अर्ज सादर करावेत.

१०) पदस्थापना देणे बाबत अंतीम निर्णय अध्यक्ष निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी राखुन ठेवले आहेत त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रदद करण्यात येईल.

११)जाहिरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गसाठी ३८ वर्ष व मागास प्रवर्गसाठी ४३ वर्ष राहिल तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियाना मध्ये कार्यरत कर्मचारी यांचे साठी सदर वयोमर्यादा ५ वर्ष शिथील राहील.

१२) उपरोक्त पदाकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छाननी करुन गुणानुक्रमा नुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल

१३)शासकीय,निमशासकिय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणा-या अनुभवाचा विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल इतर कोणताही अनुभव ग्राहय धरला जाणार नाही.

१४) विशेषतज्ञ/कर्मचारी या पदाकरीता शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त/ अधिकारी या पदाकरीता अर्ज करीत असल्यास शासकीय सेवेत रुजु झाल्याचा दिनांक कार्यकाळ पदनाम व निवृत्त झालेचे वर्ष सेवानिवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अतिम वेतन व सेवा निवृत्ती नंतर देय असलेले वेतन (पेन्शन)या बाबतची संपुर्ण माहिती अर्जामध्ये नमुद करावी

१५)वैदयकीय अधिकारी पदासाठी सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी यांचे कमाल वयोमर्यादा ७० वर्ष कमाल मर्यादा राहील तसेच शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शल्याचिकित्सक यांचे वैदयकिय प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील त्यानंतरच नियुक्ती आदेश देण्यात येईल.

१६)अर्जदाराला कंत्राटी कालावधीत सोई नुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करीता येणार नाही

१७) उपरोक्त पदापैकी तांत्रिक पदाकरीता,स्टाफ नर्स,,वैदयकीय अधिकारी ई.पदाकरीता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक रहील अन्यथा उमेदवारास मुलाखतीस अपात्र ठरविले जाईल

१८)भरती प्रक्रीया स्थगीत करणे/रदद करणे/पदभरती प्रक्रियेस बदल करण्याचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत याबाबत कोणताही दावा करीता येणार नाही

१९) **वैद्यकिय अधिकारी Medical Office (MBBS) या पदासाठी उमंदवारांनी दिनांक २४/०४/२०२३ पर्यंत विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद बुलढाणा येथे सादर करण्यात यावे MBBS पदाच्या पात्र उमेदवारांची यादी दिनांक २५/०४/२०२३ राजी प्रसिदध करण्यात येईल व पात्र उमेदवारांची मुलाखत दिनांक :२६/०४/२०२३ रोजी आयोजीत करण्यात येवुन पात्र उमेदवारांची मुलाखतीअंती निवड करयात येईल.**

२०) MPW (Male) व Staff Nurse (Female) या उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्राच्या छायांकित सत्यप्रतीसह आपले अर्ज जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद बुलढाणा येथे दिनांक २०/०४/२०२३ ते २८/०४/२०२३ रोजी संध्याकाळी ०६.वाजे पर्यत सुटीचे दिवस वगळून व्यक्तीश / पोस्टाने सादर करावेत दिनांक २८/०४/२०२३ नंतर प्राप्त अर्ज (व्यक्तीश/पोस्टाने )स्विकारले जाणार नाही यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी

२१)मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवाराना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय रहाणार नाही.

२२) खुल्या प्रवर्गतील पदाकरीता रु१५०/ व राखिव प्रवर्गातील पदाकरीता रु १००/ चा डिमांड ड्रफट District Integrated Health Family Welfare Society Buldana - या नावे देय असावा.

२३)सदरहु भरती प्रक्रीये करीता अर्ज छाननी लेखी परीक्षा/मुलाखत प्रक्रिया निवड यादी प्रसिध्द करणे हरकती/आक्षेप प्राप्त करुण घेणे व निकाली काढणे आदी रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडील प्राप्त मार्गदर्शक सुचनां नुसार भरती प्रक्रिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवाराना नियुक्ती आदेश देणे इ.बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी जिल्हा परिषद किंवा जिल्हाधिकारी याच्या सकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारानी नोद घ्यावी उमेदवांराशी भरती प्रक्रिया संबधी कोणताही पोस्टाने व्यवहार केला जाणार नाही सदर विषयी कार्यालयात विचारणा करण्यात येऊ नये.

२४) MBBS पदांकरीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार शैक्षणिक अर्हतेच्या सादर केलेल्या प्रमाणपत्रानुसार व शासकीय अनुभवानुसार गुणांक यादी तयार करण्यात येवुन १:३ या प्रमाणे मुलाखतीस बोलविण्यात येईल.

२५) ज्या पदाकरीता कौशल्य चाचाणी अनिवार्य करण्यात आलेली आहे अशा पदांची कौशल्य चाचणी घेणेबाबतचे अधिकार समितीने राखुन ठेवले आहेत

२६) मा.सहसंचालक (अतांत्रीक) रा.आ.अ. मुंबई यांचेपत्रक्र. राआसो/ मनुष्यबळ/ आरक्षण/ २४५४६-७७४/१६ दि. २०.०७.२०१६ रोजीच्या पत्रानुसार आवश्यक असणा-या आरक्षीत संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करणा-या इतर संवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

27) Staff Nurse पदासाठी मुळ शैक्षणिक अहर्ता GNM आहे, ज्या उमेदवांनी GNM करुन B'sc नर्सिंग केले असेल अशाच उमेदवांना अतिरीक्त शैक्षणिक अर्हतेचे १० गुण देण्यात येतील, ज्या उमेदरांची मुळ शैक्षणिक अर्हता हि B'sc नर्सिंग असेल अशा उमेदवारांना अतिरीक्त शैक्षणिक अर्हतेचे १० गुण दिल्या जाणार नाही परंतु सदर उमेदवार M,sc असेल तर अशा उमेदवारांना अतिरीक्त शैक्षणिक अहर्ततेचे १० गुण दिल्या जातील.

28) Staff Nurse पुरुष पदासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांची दिनांक २७ फेब्रुवारी २०२१ चे अधिसुचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल

29) Covid -19 मध्ये काम केले आहे अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल, याकरीता त्यांच्याकडे Covid 19 मध्ये काम केल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील. तसेच ज्या पदासाठी अर्ज सादर केलेला आहे त्याच पदाचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल

30) आरोग्य सेवक (MPW) या पदाची गुणवत्ता यादी ही १२ वी विज्ञान शाखेच्या गुणाच्या टक्केवारी नुसार करण्यात येईल

खालील प्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रे सांक्षाकित केलेल्या प्रती अर्जाच्या नमुन्याला जोडाव्यात

31) सर्व प्राप्त अर्जांची शैक्षणिक अर्हता आणि आवश्यक अनुभव या आधारे छाननी करण्यात येईल छाननी अंती सर्व निकष पुर्ण करणाऱ्या उमेदवारास खालील तक्यात नमुद केल्यानुसार गुणांक देण्यात येतील.

| विविरण | तपशिल | अधिकतम गुण |
|---|---|---|
| Qualifying Exam मधील गुण (त्यांच्या अंतीम वर्षाच्या गुणाच्या आधारे | मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे ७० साठी Proportion काढुन (उदा.६०: गुण असल्यास त्याचे ७० चे roportion = 60*70/100=42) | अधिकतम गुण ७० |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षधिक अर्हता असल्यास (संबंधीत विषयाची शैक्षणिक अर्हता विचारात घेण्यात येईल. | अधिकतम १० गुण देण्यात येतील (उदा. **स्टाफ नर्स (Staff Nurse)** पदासाठी ठेब नर्सिंग उमेदवार असल्यास १० गुण., औषध निर्माण अधिकारी पदासाठी B.Farm असल्यास १० गुण | १० |
| शासकिय,एन.एच.एम. मध्ये कामाचा अनुभव असल्यास (किमान अनुभव १ वर्ष) | प्रत्येक एका वर्षासाठी ४ गुण देण्यात येतील फक्त शासकिय संस्था, विभाग शासन अंगीकृत संस्था यांचाच अनुभव ग्राहय धरण्यात येईल | २० |
| एकुण गुण | | १०० |

१)शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रे २)जात/वैधता प्रमाणपत्र ३) शाळा सोडण्याचा/जन्मतारखेचा दाखला ४)पासपोर्ट आकाराचे २फोटो ५) शासकिय अनुभव असलेल प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र

अध्यक्ष निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद बुलढाणा

# राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद बुलडाणा

# अर्जाचा नमुना

________________________________ या पदासाठी अर्ज

प्रती,

मा. सदस्य सचिव,

जि.ए.आ.व कु.क.सो,

तथा जिल्हा अरोग्य अधिकारी

जिल्हा परिषद, बुलडाणा

१) संपूर्ण नांव :________________________________

२) वडिलांचे/पतीचे नांव :________________________________

३) आईचे नांव :________________________________

४) पत्रव्यवहाराचा पत्ता :________________________________

(पिनकोड सहित) ________________________________

५) दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक : ____________ ईमेल आयडी ________________________

६) जन्मतारीख : / / आज रोजीचे वय ______वर्षे ______महिने ______दिवस

७) कोणत्या प्रवर्गासाठी अर्ज केलेला आहे त्याप्रमाणे चौकटीमध्ये (☐) अशी खुन करावी.

| अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | आर्थिक मागास प्रवर्ग | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJA | NTB | NTC | NTD | SBC | OBC | EWS | Open |
| | | | | | | | | | |

८) शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नांव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

९) अनुभव

| संस्थेचे नांव व पत्ता | कालावधी | | एकूण कालावधी |
|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | |
| | | | |
| | | | |
| | | | |

१०)डीमांड ड्राफ्ट क्रमांक :- ..............................................................................................

११)आपणाविरुध्द न्यायप्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे काय असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा

१२)अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडल्या आहेत.

१)

२)

३)

४)

५)

६)

७)

१३) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय होय/नाही.............

मी असे प्रमाणीत करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रदद करण्यात येईल व माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

दिनांक :

ठिकाण :

स्वाक्षरी ——————————————

नांव——————————————